INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 16 | ISSUE - 6 | JULY – 2026

# भाषिक सापशिडी - निपुण बालकांच्या वाटचालीचा अभ्यास

सौ. मृगया मंगेश मोरे
जि. प. शाळा कोलधे नं. १ ता. लांजा जि. रत्नागिरी

## प्रस्तावना




शैक्षणिक संशोधनाच्या दृष्टीने पायाभूत साक्षरता हा विषय सध्याच्या भारतीय शिक्षण प्रणालीत केंद्रस्थानी आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२० नुसार, प्राथमिक स्तरावर प्रत्येक मुलाने मूलभूत भाषिक कौशल्ये प्राप्त करणे, जेणेकरून ते इयत्ता तिसरीपर्यंत 'निपुण बालक' बनू शकतील ही एक आवश्यक अट आहे. पायाभूत भाषिक कौशल्ये मजबूत असल्यास, विद्यार्थ्यांना केवळ मातृभाषेतच नव्हे, तर दुसऱ्या भाषादेखील अधिक सहजपणे शिकता येतात, जो त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीचा पाया असतो.

प्रस्तुत अभ्यास याच राष्ट्रीय उद्दिष्टांच्या स्थानिक अंमलबजावणीचा एक व्यावहारिक प्रयत्न होता. हा अभ्यास जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा गवाणे नं. १, तालुका लांजा, जिल्हा रत्नागिरी येथे जुलै २०२५ ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीत उपक्रम पद्धतीवर आधारित राबविला होता.

## स्थानिक समस्या आणि गरजांचे विश्लेषण

उपक्रम राबवण्यापूर्वी केलेल्या पूर्व-निरीक्षणातून शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये पायाभूत भाषिक कौशल्यांमधील गंभीर कमतरता स्पष्ट झाली.

## उपक्रमाचे नाविन्यपूर्ण अधिष्ठान

या समस्यांवर उपाय म्हणून, शिक्षकांनी 'खेळावर आधारित अध्यापन' हा दृष्टिकोन स्वीकारला. अमेरिकन अकॅडमी ऑफ पेडियाट्रिक्सच्या मते, खेळ हे लहान मुलांसाठी 'काम' असते, ज्यातून ते सामाजिक, संज्ञानात्मक आणि भाषिक कौशल्ये सुरक्षित वातावरणात सहजपणे आत्मसात करतात. सापशिडी हा खेळ विद्यार्थ्यांमध्ये अत्यंत लोकप्रिय असल्याने, या खेळाच्या माध्यमातून भाषिक कौशल्यांचे प्रशिक्षण देणे, हा या उपक्रमाचा मूळ विचार होता. या उपक्रमाने विद्यार्थ्यांच्या निष्क्रीय वेळेचे रूपांतर 'स्वयं-अध्ययन' या प्रेरणादायी अनुभवांमध्ये केले, ज्यामुळे तो NEP 2020 च्या 'आनंददायी भयमुक्त शिक्षण' या तत्त्वज्ञानाशी सुसंगत ठरला.

## समस्या विधान

जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा गवाणे नं. १ येथील इयत्ता पहिली ते तिसरीच्या विद्यार्थ्यांमध्ये पायाभूत भाषिक कौशल्यांचा भाषिक सापशिडी उपक्रमाद्वारे निपुण बालक वाटचालीचा अभ्यास .

## संशोधनाची उद्दिष्टे

प्रस्तुत संशोधनाची खालील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली.

१. इयत्ता पहिली ते तिसरीतील विद्यार्थ्यांच्या वाचन प्रवाहाचा, गतीचा आणि शुद्धलेखनाच्या स्तराचा विकास करणे.

२. विद्यार्थ्यांच्या मराठी भाषेतील शब्दसंपत्तीची वाढ करून त्यांच्या भाषिक अभिव्यक्तीला बळ देणे.

३. विद्यार्थ्यांमध्ये गटकार्य, सहकार्य, आणि निकोप स्पर्धेची भावना रुजवून सामाजिक आणि भावनिक कौशल्यांचा विकास करणे.

४. मनोरंजक कृतींद्वारे वाचन-लेखनाची आवड निर्माण करून स्वमत लेखनाचा सृजनशील क्षमता विकसित करणे.

५. विद्यार्थ्यांच्या स्वानुभव व सहकाऱ्यांच्या मदतीने भाषिक समस्यांचे निराकरण करण्याची क्षमता विकसित करणे.

व्याप्ती

या संशोधनाची व्याप्ती जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा गवाणे नं. १ येथील निवडलेल्या ७७ विद्यार्थ्यांपर्यंत मर्यादित होती. संशोधन प्रामुख्याने पायाभूत भाषिक कौशल्ये आणि त्या संबंधित संज्ञानात्मक आणि सामाजिक बदलांवर केंद्रीत होते.

## नमुना निवडीची पद्धत

संशोधनासाठी न्यादर्श सहेतुक नमुना निवड पद्धतीवर आधारित होता. तसेच उच्च अध्ययन स्तर गाठलेल्या इयत्ता ७ वीच्या विद्यार्थ्यांचा गटप्रमुख म्हणून समावेश केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययनाच्या प्रगतीवर 'पीअर-लर्निंग' घटकाचा विशिष्ट प्रभाव पडला जो इतर शाळांमध्ये उपलब्ध नसू शकतो.

## संशोधनाची पद्धत

या शोधनिबंधामध्ये सर्वेक्षण निरीक्षण व प्रायोगिक या तिन्ही प्रकारच्या संशोधन पद्धती वापरण्यात आल्या आहेत.

## संशोधनाचा प्रकार आणि अभिकल्प

प्रस्तुत संशोधन **'शैक्षणिक संशोधन'** या प्रकारातील आहे. शिक्षकांना त्यांच्या दैनंदिन वर्गातील तातडीच्या समस्यांवर नियोजनबद्ध, व्यावहारिक आणि प्रभावी उपाय शोधण्यासाठी ही पद्धत अत्यंत उपयुक्त ठरते. उपक्रमाची परिणामकारकता सांख्यिकीय पद्धतीने तपासण्यासाठी 'पूर्व चाचणी – उत्तर चाचणी' या अभिकल्पाचा अवलंब करण्यात आला.

## संशोधन अंमलबजावणीचे नियोजन

वर्गाध्यापनाच्या नियमित वेळेत कोणताही अडथळा येणार नाही याची खात्री करण्यासाठी विशेष काळजी घेण्यात आली. याकरिता 'भाषिक सापशिडी' उपक्रम कार्यालयीन वेळेपूर्वी आणि कार्यालयीन वेळेनंतर, तसेच शनिवारी अतिरिक्त वेळेत राबवण्याचे नियोजन करण्यात आले होते. यामुळे औपचारिक शिक्षणावर नकारात्मक परिणाम न होता संशोधनाची अंमलबजावणी यशस्वी झाली.

## नमुना

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक स्तरावरील सर्व विद्यार्थ्यांची यादृच्छिक पद्धतीने निवड करण्यात आली आहे. प्रस्तुत अभ्यासाची जनसंख्या जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक शाळा गवाणे नं. १ येथील सर्व विद्यार्थी होती. संशोधनासाठी इयत्ता दुसरी ते सातवीतील एकूण ७७ विद्यार्थ्यांची निवड न्यादर्श म्हणून करण्यात आली. पायाभूत साक्षरतेवर (इयत्ता १ ते ३) लक्ष केंद्रित असले तरी, उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी आणि अडचणींवर मात करण्यासाठी उच्च स्तरावरील विद्यार्थ्यांचाही समावेश करणे आवश्यक होते.

## गटप्रमुख आणि पीअर-लर्निंग दृष्टिकोन

संशोधनातील एक महत्त्वाचा धोरणात्मक निर्णय म्हणजे इयत्ता सातवीतील उच्च अध्ययन स्तर गाठलेल्या विद्यार्थ्यांना गटप्रमुख म्हणून निवडणे. शिक्षकांच्या कमतरतेमुळे निर्माण झालेल्या आव्हानांवर मात करण्यासाठी हा 'पीअर-लर्निंग' दृष्टिकोन स्वीकारण्यात आला. या दृष्टिकोनामुळे दोन महत्त्वपूर्ण फायदे झाले. प्रथम कनिष्ठ विद्यार्थ्यांना वैयक्तिक लक्ष मिळाले जे कमी शिक्षकसंख्या असलेल्या शाळेत शक्य नव्हते. दुसरे गटप्रमुखांमध्ये नेतृत्व क्षमता, सामाजिक जबाबदारी आणि इतरांना शिकवण्याची क्षमता विकसित झाली. या पद्धतीने, संसाधनांची कमतरता ही समस्या न राहता, ती एक प्रभावी सामाजिक अध्ययन मॉडेल तयार करण्याची संधी ठरली.

## १२. संशोधनाची साधने -

प्रस्तुत संशोधनात माहितीची विश्वासार्हता वाढवण्यासाठी आणि गुणात्मक तसेच संख्यात्मक दोन्ही प्रकारच्या नोंदी घेण्यासाठी बहु-साधन दृष्टिकोन वापरला.

### १२.१ प्रश्नावली

विद्यार्थ्यांच्या भाषिक क्षमतेची तपासणी करण्यासाठी पूर्व चाचणी आणि उत्तर चाचणीच्या स्वरूपात एक विस्तृत प्रश्नावली वापरली गेली. या प्रश्नावलीमध्ये अक्षर वाचन, शब्दलेखन, स्वरचिन्हे, जोडाक्षरे, आरोह-अवरोहासह उतारा वाचन आणि स्वमत लेखन अशा पायाभूत स्तरापासून ते प्रगत स्तरापर्यंतच्या क्रमिक कृतींचा समावेश होता. या क्रमिक कृतींमुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे अचूक मापन करणे शक्य झाले.

### १२.२ निरीक्षण

उपक्रम राबवताना शिक्षकांनी आणि गटप्रमुखांनी विद्यार्थ्यांच्या वर्तणुकीच्या नोंदी घेतल्या. यामध्ये विद्यार्थ्यांचे श्रुतलेखन करताना लक्षपूर्वक ऐकणे, उच्चार समजून घेणे, घाई न करणे आणि भाषिक क्रियाकलापांमध्ये स्वेच्छेने सहभाग घेणे या वर्तणुकीच्या नोंदी घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांची आंतरिक प्रेरणा आणि स्वयं-नियमन क्षमता तपासण्यासाठी निरीक्षण हे महत्त्वाचे गुणात्मक साधन ठरले.

### १२.३ तक्ते आणि संख्यात्मक नोंदी

विद्यार्थ्यांच्या पूर्व चाचणीतील आणि अंतिम चाचणीतील गुणांची संख्यात्मक माहिती तक्त्यांच्या स्वरूपात संकलित करून, तुलनात्मक विश्लेषणासाठी आधार तयार करण्यात आला. हे तक्ते सांख्यिकीय विश्लेषणासाठी महत्त्वपूर्ण ठरले.
संशोधनाची कार्यवाही - उपक्रमाचे नियोजन आणि कार्यवाही जुलै २०२५ ते ऑक्टोबर २०२५ या तीन मुख्य टप्प्यांमध्ये विभागली होती. तयारी, अंमलबजावणी आणि नियमित कृती मालिका.

नियोजन आणि तयारी (जुलै २०२५)
कार्यवाहीचे मुख्य टप्पे आणि कृती मालिका
*खेळाचे नियम ठरवणे आणि प्रारंभिक सराव*

गटप्रमुखांच्या मदतीने खेळाचे नियम निश्चित करण्यात आले (उदा. सहाचा फासा पडल्याशिवाय सुरुवात नाही; प्रत्येक घरातील कृती पूर्ण केल्याशिवाय पुढे जाता येणार नाही). या नियमांमुळे विद्यार्थ्यांना संयम, शिस्त आणि नियमपालन करण्याची सवय लागली. यानंतर 'अक्षरफुले वेचू चला' आणि 'मीच शब्दांचा बादशहा' या स्पर्धात्मक कृतींमधून अक्षरवाचन आणि शब्दवाचन-लेखनाचा सराव घेण्यात आला. १० पैकी १० गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना 'शब्दांचा बादशहा' म्हणून घोषित करण्यात आले, ज्यामुळे स्पर्धेची भावना वाढली. 'वापर रीड अलाँग ॲपचा' या कृतीमध्ये विद्यार्थ्यांना वाचनगती सुधारण्यासाठी तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर करण्यास शिकवले गेले. ॲपमध्ये जमा होणारे 'पॉईंट्स' पाहून विद्यार्थी आपल्या मित्रांपेक्षा जास्त गुण मिळवण्यासाठी स्वयंस्फूर्तीने वाचन करू लागले. हे तंत्रज्ञान वाचन गती सुधारण्यासाठी अत्यंत फायद्याचे ठरले आणि विद्यार्थ्यांची निष्क्रियता कमी झाली.

### *गती आणि अचूकतेसाठी स्पर्धा*

वाचन आणि लेखन कौशल्यांना गती आणि अचूकतेची जोड देण्यासाठी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या:

- **'घड्याळाची टिकटिक, करी वाचनगती ठीक':** यामुळे कमी वेळेत आणि ओघाने वाचन करण्याची सवय लागली.
- **'पैज लागली लेखनवीरांची':** या लेखन स्पर्धेत शुद्धलेखन, मात्रा आणि विरामचिन्हांसह अचूक लेखन करण्यावर जोर दिला गेला.

### *प्रत्यक्ष भाषिक सापशिडी खेळ*

भाषिक सापशिडीतील १ ते १०० घरांमध्ये भाषिक कौशल्यांनुसार कृतींची मालिका निश्चित करण्यात आली. ही श्रेणी अक्षर ओळख, शब्दवाचन, उतारा वाचन, विरामचिन्हे ओळख, जोडाक्षरी शब्द आणि अखेरीस स्वमत लेखन, बातमी वाचन व संवाद वाचन अशा पायाभूत स्तरापासून ते प्रगत स्तरापर्यंतच्या ८८ क्षमता पूर्ण करण्यासाठी तयार करण्यात आली होती. शिडी मिळाल्यास प्रगती आणि साप आल्यास मागील स्तरावर येऊन कृतीची पुनरावृत्ती करावी लागते. १०० घरे पूर्ण करणारा विद्यार्थी 'निपुण बालक' म्हणून घोषित करण्यात आला.

### निष्कर्ष

उपक्रम पूर्ण झाल्यानंतर घेतलेल्या पूर्व व उत्तर चाचणीच्या निष्कर्षांचे संख्याशास्त्रीय विश्लेषण, उपक्रमाची उच्च परिणामकारकता सिद्ध करते.

| निरीक्षण घटक | पूर्व चाचणीची टक्केवारी | | उत्तर चाचणीची टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | विद्यार्थ्यांची संख्या (77 पैकी) | टक्केवारी | विद्यार्थ्यांची संख्या (77 पैकी) | टक्केवारी |
| अक्षर ओळख | 60 | 78% | 77 | 100% |
| वाचन प्रवाह | 20 | 26% | 75 | 97% |
| चित्रकथा प्रतिक्रिया | 40 | 52% | 75 | 97% |
| आत्मविश्वासपूर्वक लेखन | 40 | 52% | 70 | 91% |
| अचूक लेखन करणारे | 32 | 42% | 68 | 88% |
| भाषा क्रियाकलाप सहभाग | 51 | 66% | 72 | 93% |




## उपक्रमापूर्वीची आणि उपक्रमानंतरची स्थिती

## तुलनात्मक सांख्यिकीय विश्लेषण

एकूण ७७ विद्यार्थ्यांच्या (इयत्ता २ री ते ७ वी) पूर्व चाचणीतील आणि अंतिम चाचणीतील गुणांचे तुलनात्मक विश्लेषण खालीलप्रमाणे आहे.

पूर्व चाचणी आणि अंतिम चाचणीतील तुलनात्मक विश्लेषण (टक्केवारी)

| निरीक्षण घटक | उपक्रम पूर्वस्थिती (टक्केवारी) | उपक्रमानंतरची स्थिती (टक्केवारी) | सुधारणा (टक्केवारी) |
|---|---|---|---|
| अक्षर ओळख | ७८% | १००% | २२% |
| वाचन प्रवाह | २६% | ९७% | ७१% |
| चित्रकथा प्रतिक्रिया (आकलन) | ५२% | ९७% | ४५% |
| आत्मविश्वासपूर्वक लेखन | ५२% | ९१% | ३९% |
| अचूक लेखन करणारे | ४२% | ८८% | ४६% |
| भाषा क्रियाकलाप सहभाग | ६६% | ९३% | २७% |

## गृहितकांची तपासणी आणि सखोल विश्लेषण

सांख्यिकीय विश्लेषणाने संशोधनाची तिन्ही गृहीतके सार्थ ठरवली. प्राप्त झालेल्या निष्कर्षांचे सखोल विश्लेषण खालीलप्रमाणे आहे.

### *वाचन प्रवाहातील क्रांती*

या उपक्रमाचा सर्वात प्रभावी परिणाम 'वाचन प्रवाह' या घटकात दिसून आला. पूर्व चाचणीत केवळ २६% विद्यार्थी वाचन प्रवाहात सक्षम होते; उपक्रमानंतर ही टक्केवारी ९७% पर्यंत पोहोचली, जी ७१% ची लक्षणीय सुधारणा दर्शवते.

या निष्कर्षांचे महत्त्वाचे शैक्षणिक निहितार्थ आहेत. पूर्व चाचणीमध्ये अक्षर ओळख (७८%) आणि वाचन प्रवाह (२६%) यांमध्ये असलेली मोठी दरी (५२%) कार्यात्मक साक्षरतेच्या अभावाकडे निर्देश करत होती. याचा अर्थ विद्यार्थ्यांना अक्षरे माहीत असूनही ती ओघाने जोडण्याची क्षमता नव्हती. सापशिडी उपक्रमातील स्पर्धात्मक आणि संरचित कृतींमुळे मूलभूत कौशल्यांचे यांत्रिक ओळखीतून कार्यात्मक उपयोगात जलद रूपांतरण झाले. तसेच चित्रकथा प्रतिक्रिया (आकलन) मध्ये ४५% सुधारणा (५२% वरून ९७%) झाल्यामुळे, विद्यार्थ्यांनी केवळ वाचन केले नाही, तर ते वाचलेल्या मजकुराचा अर्थ समजू शकले.

अचूक लेखन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत ४६% वाढ झाली (४२% वरून ८८%). 'पैज लागली लेखनवीरांची' या कृतीमुळे विद्यार्थ्यांना शुद्धलेखन, मात्रा आणि विरामचिन्हे वापरण्याची सवय लागली. या सुधारणेमुळे विद्यार्थी अनुलेखनाऐवजी (केवळ कॉपी करणे) समजपूर्वक लेखन करण्याकडे वळले, ज्यामुळे त्यांची सर्जनशील स्वमत लेखनाची क्षमता विकसित झाली. आत्मविश्वासपूर्वक लेखन करणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी ५२% वरून ९१% पर्यंत वाढली, जी भाषिक आत्मविश्वासातील मोठी वाढ दर्शवते.

### *स्वयंअध्ययन आणि सामाजिक सहभाग*

भाषा क्रियाकलापांमध्ये सक्रिय सहभाग ६६% वरून ९३% पर्यंत पोहोचला, जी २७% ची लक्षणीय वाढ आहे. हे आकडे सिद्ध करतात की उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये भाषेबद्दलची गोडी (आवड) वाढली आणि भयमुक्त शिक्षण वातावरणामुळे त्यांचा आत्मविश्वास उंचावला.

खेळावर आधारित अध्यापन पद्धती आणि पीअर-लर्निंग दृष्टिकोन वापरल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वयंअध्ययन प्रवृत्ती वाढली. विद्यार्थ्यांनी मध्यान्ह भोजन लवकर आटपून किंवा जादा वेळेत या उपक्रमात सहभाग घेतला. हे दर्शवते की जेव्हा अध्ययनाची प्रक्रिया प्रेरणादायक असते, तेव्हा वेळेची मर्यादा आपोआप गळून पडते आणि विद्यार्थी निष्क्रियतेऐवजी सक्रिय अध्ययनाकडे वळतात.

## उपक्रमाची फलनिष्पत्ती

'भाषिक सापशिडी' या नवोपक्रमाची फलनिष्पत्ती बहुआयामी ठरली.

- **सामाजिक भावनिक विकास:** गटकार्य आणि सहकार्याच्या भावनेमुळे भाषेच्या समस्या सोडवताना आत्मविश्वास मिळाला. संसाधनांची कमतरता (उदा. फासे) यावर विद्यार्थ्यांनी स्वतः पर्याय शोधले, ज्यामुळे त्यांच्या समस्या निराकरण क्षमतेत सुधारणा झाली.
- **तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर:** विद्यार्थी आता मोबाईल आणि टीव्हीचा वापर केवळ मनोरंजनासाठी न करता, स्वयंअध्ययनासाठी (उदा. रीड अलाँग ॲप किंवा गुगल सर्च) करू लागले, ज्यामुळे तंत्रज्ञान शैक्षणिक उद्दिष्टांसाठी वापरण्याची सवय लागली.
- **सामाजिक सहकार्यात वाढ:** उपक्रमाच्या यशामुळे पालक आता विद्यार्थ्यांच्या भाषिक कृतींचा नियमित आढावा घेऊ लागले. तसेच, समाजातील विविध घटक (उदा. माजी विद्यार्थी) शाळेच्या विकासासाठी सक्रियपणे आर्थिक आणि भौतिक साहाय्य करू लागले, ज्यामुळे शाळेच्या गुणवत्तेत वाढ झाली.

## समारोप -

प्रस्तुत भाषिक' सापशिडी खेळू या, निपुण बालक शोधू या' हा शैक्षणिक संशोधन प्रकल्प इयत्ता पहिली ते तिसरीतील विद्यार्थ्यांच्या पायाभूत भाषिक साक्षरतेच्या (FLN) विकासासाठी अत्यंत यशस्वी ठरला आहे. पूर्व चाचणी आणि उत्तर चाचणीतील आकडेवारी तसेच पेअर्ड टी-चाचणीच्या विश्लेषणातून सिद्ध होते की, या उपक्रमामुळे अक्षर ओळख, शब्दसंग्रह, वाचन गती (७१% सुधारणा) आणि अचूक लेखन (४६% सुधारणा) या पायाभूत कौशल्यांमध्ये लक्षणीय आणि सांख्यिकीयदृष्ट्या सार्थ सुधारणा झाली आहे.

या उपक्रमाने केवळ भाषिक क्षमता वाढवल्या नाहीत, तर संस्थात्मक आणि लॉजिस्टिकल समस्यांवर प्रभावीपणे मात केली. शिक्षक संख्या कमी असतानाही, इयत्ता सातवीतील गटप्रमुखांचा वापर करून 'पीअर-लर्निंग'चे मॉडेल यशस्वीरीत्या राबवता आले. यामुळे कमी मनुष्यबळातही उच्च परिणाम साधता आला. तसेच, खेळातून मिळालेला आनंद आणि निकोप स्पर्धा या घटकांनी विद्यार्थ्यांची आंतरिक प्रेरणा वाढवून त्यांना भयमुक्त वातावरणात शिकण्याची संधी दिली. हा उपक्रम कमी खर्चातील, उच्च-परिणाम साधणारा आणि आनंददायी अध्यापन दृष्टिकोन स्वीकारणारा असल्याने, विशेषतः संसाधनांची कमतरता असलेल्या ग्रामीण भागातील शाळांसाठी एक आदर्श मॉडेल म्हणून स्वीकारण्याची शिफारस केली जाते.

या यशस्वी कृती-संशोधनाच्या आधारावर, पुढील संशोधनासाठी खालील दिशानिर्देश सुचवले जातात. पुढील संशोधनामध्ये, 'भाषिक सापशिडी' या उपक्रमाची परिणामकारकता गणितातील 'संख्याज्ञान सापशिडी' या उपक्रमाशी तुलना करून, पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान (FLN) च्या एकात्मिक विकासावर होणारे संयुक्त परिणाम तपासले जावेत. तसेच, या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या सामाजिक भावनिक शिक्षण क्षमतेवर दीर्घकाळात होणाऱ्या परिणामांचे स्वतंत्रपणे गुणात्मक मूल्यांकन करणे आवश्यक आहे.

## १७. संदर्भ

१. मोरे, मृगया मंगेश (२०२५). **सापशिडी खेळू या, निपुण बालक शोधू या (नवोपक्रम).** महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

२. **NEP 2020.** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (मराठी). शिक्षण मंत्रालय, भारत सरकार.

३. SCERT Maharashtra. **NIPUN Maharashtra मार्गदर्शक सूचना.**

४. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे. **दिशा नवोपक्रमाची आणि**